महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहीर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक मग्रारो-२०१५/प्र.क्र.६३ / रोहयो-१०अ
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २० मे, २०१५.

वाचा:- शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक-मग्रारोहयो-२०११/प्र.क्र.५६/रोहयो-१०अ, दिनांक ३ जून, २०११.

प्रस्तावना:-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या परिशिष्ट-१ मध्ये या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामांची यादी देण्यात आलेली आहे. या परिशिष्टाच्या कलम (१) अनुसार जलसंधारण व जलसंवर्धनाची कामे घेण्याची तरतूद आहे. या तरतूदी अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहीर पुर्नभरणाची कामे घेता येतात. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहिर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत शासनाने एकत्रितरित्या सुधारित मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन दिनांक ३ जून, २०११ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेली आहेत. त्यानुसार राज्यात विहीर पुनर्भरणाची कामे घेणे आवश्यक आहे. राज्यातील दुष्काळ, अवकाळी पाउस, गारपीट इ. नैसर्गिक आपतीं लक्षात घेता विधानमंडळात दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी मा. राज्यमंत्री (कृषि, फलोत्पादन) यांनी विधानसभेत आणि मा.राज्यमंत्री, गृह, नगरविकास, संसदीय कार्य यांनी विधानपरिषदेमध्ये केलेल्या निवेदनात टंचाई परिस्थितीत करावयाच्या विविध उपाययोजना सुचविल्या आहेत. त्यामध्ये राज्यात विहीर पुनर्भरणाची १ लक्ष कामे घेण्यात येतील असे निवेदन केले आहे. त्यानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राज्यात विहीर पुनर्भरणाची कामे घेणेबाबत खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

शासन परिपत्रक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यात विहीर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत संदर्भाधीन दिनांक ३ जून, २०११ अन्वये सविस्तर आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राज्यात विहीर पुनर्भरणाची कामे तातडीने घेण्यात यावीत.

२. संदर्भाधीन शासन निर्णयात मजुरीचा दर रु. १२७/- नमुद करण्यात आला आहे. तथापि केंद्र शासनाने एप्रिल, २०१५ पासुन मजुरी दर रू. १८१/- एवढे निश्चित केलेले आहे. तेव्हा

या सुधारीत दराप्रमाणे विहीर पुनर्भरणाच्या कामाचे तांत्रिक व आर्थिक मापदंड तयार करून कामे घेण्यात यावीत.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहीर पुनर्भरण कार्यक्रम राबविताना खालील बाबींचे पालन करणे अनिवार्य राहील.

अ) ग्राम पंचायत/ ग़ाम सभा यांच्या लाभार्थीच्या निवडीबाबतचा ठराव व शिफारस आवश्यक.

ब)) प्रत्येक विहीर पुनर्भरणाचे काम हे स्वतंत्र काम समजण्यात यावे. सर्व प्रकारच्या अकुशल कामासाठी जॉबकार्ड आवश्यक राहील.

क) ज्या लाभार्थ्याला विहीर पुनर्भरणाचा लाभ देण्यात येणार आहे तो जॉबकार्डधारक असला पाहिजे. तसेच त्याने मजूर म्हणुन काम करून मजूरी घेणे आवश्यक आहे.

ड) मग्रारोहयेाच्या मार्गदर्शक तत्वानुसार हजेरीपत्रक ठेवणे, बँक किंवा पोस्टामार्फत मजूरीचे प्रदान करणे, इत्यादी कार्यपध्दतीचा अवलंब झाला पाहिजे.

इ) या येाजनेंतर्गत कंत्राटदार/ ठेकेदार यांना बंदी राहील.

ई) मग्रारोहयेा अंतर्गत विहीर पुनर्भरणाचे काम करताना कुशल भागाचे काम करण्यासंदर्भात दिनांक ५/१०/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे अकुशल व कुशल कामाचे ६०:४० हे प्रमाण कामाच्या वार्षिक एकत्रित प्रमाणानुसार ग़ापंचायत/ जिल्हा स्तरावर ठेवणे आवश्यक आहे.

फ) सदर कामे करताना मजुर स्थानिक असावा.

ग) अकुशल मजुरांना हजेरीपत्रकाद्वारे मजुरी प्रदान करणे अनिवार्य राहील व अर्धकुशल/ कुशल मजुरांना पावतीद्वारे (Voucher) प्रदान करण्यास हरकत नाही.

४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी येाजनेंतर्गत विहीर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत शासनाने यापूर्वी निर्गमित केलेल्या दिनांक ३ जून, २०११ मध्ये ज्या अटी, शर्ती व निकष विहित केले आहेत त्यात केाणताही बदल नाही त्यानुसारच सदर कामे घेण्यात यावीत.

५. विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागात या येाजनेंतर्गत झालेल्या कामाचा, सुरू असलेल्या कामाचा सविस्तर आढावा घेवुन विहीर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

६. जिल्ह्यात विहीर पुनर्भरणाची एकूण किती कामे घेण्यात आली व किती कामे सुरू आहेत याबाबतचा सविस्तर मासिक अहवाल विभागीय आयुक्तांनी दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास सादर करावा.

७) सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५२९१५४०५९०१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(आर.विमला)
उपसचिव (रोहयो)

२७/५/२०१५

प्रती:
मा. राज्यमंत्री, कृषि व फलोत्पादन
मा. राज्यमंत्री, गृह, नगरविकास,संसदीय कार्य इ.
सचिव, (ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
आयुक्त, कृषी, पुणे
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे,
सर्व उपसचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी (मग्रारोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
निवड नस्ती, कार्यासन रोहयो- १०अ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.